प्रकरण १

# प्रस्तावना

# प्रकरण १

# प्रस्तावना

## १.१ संशोधन विषयाची पार्श्वभूमी

शैक्षणिक मूल्यमापन ही एक पध्दतशीर प्रक्रिया आहे . शिक्षणाचे पूर्वापेक्षित उद्दिष्टे कशी व कितपत साध्य झाली याचा शोध घेण्याचे काम शैक्षणिक मूल्यमापनात केले जाते.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यमापन करण्यासाठी मूल्यमापनाची विविध साधने उपयोगात आणली जातात. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षकांना शिक्षित करण्यासाठी शिक्षक-शिक्षक कार्यक्रम योजलेला असतो. एका वर्षाचा हा शिक्षक शिक्षण कार्यक्रम विद्यार्थी शिक्षकाला शिक्षक म्हणून शिक्षित करण्यासाठी योजलेला असल्याने या कार्यक्रमात सैध्दांतिक विषयाच्या माहितीबरोबरच प्रात्यक्षिक कार्याचा समावेश केला जातो.

शिक्षक शिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे कशी व कितपत साध्य झाली याचा शोध घेण्यासाठी शिक्षक शिक्षण कार्यक्रमात अंतर्गत मूल्यमापन व बाह्य मूल्यमापन या दोन प्रकारच्या मूल्यमापनाचा समावेश केला जातो. सैध्दांतिक विषयाची विद्यापीठाने वर्षाअखेरीस घेतलेली परीक्षा म्हणजे बाह्य मूल्यमापन होय. तर विद्यार्थी वर्षभर जे सतत कार्य करीत असतात त्याचे महाविद्यालयातील प्राध्यापकांनी केलेले सतत सर्वंकष मूल्यमापन म्हणजे अंतर्गत मूल्यमापन होय.

शिवाजी विद्यापीठाच्या जून १९९२ पासून सुरु झालेल्या सुधारित बी.एड्. अभ्यासक्रमात ५०० गुणांची सैध्दांतिक परीक्षा विद्यापीठामार्फत घेतली जाते. यालाच बी.एड्. भाग १ असे म्हणतात. बी.एड्.भाग २ हा ५०० गुणांचा असतो. यात ४०० गुणांचे महाविद्यालयीन प्रात्यक्षिक काम व १०० गुणांची पाठ प्रात्यक्षिक परीक्षा असे ५०० गुण असतात. ५०० गुणांपैकी ४०० गुण अंतर्गत मूल्यमापन पध्दतीने दिले जातात. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड. भाग २ चे गुण श्रेणी मध्ये रुपांतरीत केले जातात.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांस दिले जाणारे अंतर्गत गुण आणि सैध्दांतिक परीक्षेतील गुण यांच्यात काही सहसंबंध आहे काय? महाविद्यालयातून होणारे मूल्यमापन यथायोग्य पध्दतीने होते काय? या मूल्यमापनात सातत्य असते काय? होणारे मूल्यमापन सर्वंकष, सर्वसमावेशक असते काय? मूल्यमापन करताना मूल्यमापनाची कोणती साधने वापरली जातात? महाविद्यालयातील व विद्यापीठ स्तरावरील प्रचलित मूल्यमापन पध्दतीत कोणती सुधारणा करणे आवश्यक आहे? याचा शोध घेणे संशोधकास गरजेचे वाटले म्हणून संशोधकाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मूल्यमापन या विषयावर संशोधन करावयाचे निश्चित केले.

## १.२ संशोधन समस्या कथन

संशोधकाने आपल्या संशोधानासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मूल्यमापन हा विषय निवडला. या संशोधन विषयाचे समस्या विधान खालीलप्रमाणे :

" शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षकांचे अंतर्गत मूल्यमापन – एक चिकित्सक अभ्यास"

## १.३ संशोधन समस्येतील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या

वरील समस्या विधानामध्ये आलेल्या संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

१. **शिक्षणशास्त्र महाविद्यालय** : शिक्षक म्हणून व्यवसाय करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना ज्या महाविद्यालयात तत्संबंधी व्यावसायिक शिक्षण दिले जाते, अशा महाविद्यालयास शिक्षणशास्त्र महाविद्यालय या नावाने संबोधले जाते.

२. **विद्यार्थी-शिक्षक** : शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षक व्यवसायाचे शिक्षण घेणाऱ्या उमेदवारास विद्यार्थी शिक्षक असे म्हणतात.

३. **अंतर्गत मूल्यमापन** : मूल्यमापनाचे बाह्य मूल्यमापन व अंतर्गत मूल्यमापन असे दोन प्रकार आहेत. शिक्षणशास्त्र महाविद्यालयात बी.एड्. भाग दोन साठी योजण्यात आलेले मूल्यमापन म्हणजे अंतर्गत मूल्यमापन होय. अंतर्गत मूल्यमापनात विद्यार्थी शिक्षकाने शिक्षणशास्त्र

महाविद्यालयात वर्षभर शिक्षकी पेशाशी निगडीत जे प्रात्यक्षिक केले असेल त्याचे सातत्याने केलेले मूल्यमापन समाविष्ट होते.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे

हे संशोधन संशोधकाने खालील उद्दिष्टे विचारात घेऊन पूर्ण केले.

१. सुधारित बी.एड्. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आणि अभ्यासक्रमांतर्गत प्रात्यक्षिक कार्य यांचा संबंध शोधणे.

२. अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्याला दिलेला भारांश व प्रात्यक्षिक कार्याचे स्वरुप याची यथायोग्यता तपासणे.

३. विविध महाविद्यालयातील प्रात्यक्षिके व केलेले गुणदान यांचे परिक्षण करणे.

४. प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन करताना विविध महाविद्यालयांतून उपयोगात आणल्या जाणाऱ्या मूल्यमापन साधनांचा आढावा घेणे.

५. प्रात्यक्षिक पाठ परीक्षा व दिले जाणारे गुण यांचा अभ्यास करणे.

६. बी.एड्. भाग एक मधील गुण व बी.एड्. भाग दोन मधील गुण यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेणे.

## १.५ संशोधनाची कार्यपध्दती

सदरचे संशोधन कार्यासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला. या संशोधनाची कार्यपध्दती खाली थोडक्यात दिली आहे.

**अ) संशोधन पध्दती:** प्रथम संशोधन योजनेचा आराखडा निश्चित केला. त्यात संशोधनाची उद्दिष्टे विचारात घेवून करावयाच्या संशोधनाच्या अवस्था, व्याप्ती व कालावधी निश्चित केला. या संशोधन योजनेनुसार संशोधन कार्याची कार्यवाही केली.

१. संबंधित साहित्याचे आणि संबंधित संशोधनाचे सर्वेक्षण करुन संशोधन विषयाशी निगडीत माहिती गोळा करण्यात आली.

२. संशोधनासाठी संशोधकाने आवश्यक ती माहिती प्रश्नावली व अंतर्गत गुणांची प्रपत्रे या साधनांचा उपयोग करुन गोळा केली.

३. संशोधकाने बी.एड्. प्रात्यक्षिक कामाच्या मूल्यमापनाशी निगडीत एक प्रश्नावली तयार केली व ही प्रश्नावली बी.एड्. महाविद्यालयाच्या प्राचार्यांना व शिक्षक-प्रशिक्षकांना देऊन प्रात्यक्षिक कार्याच्या मूल्यमापनाचे स्वरुप व त्यासंबंधीत अडचणींचा शोध घेतला.

४. बी.एड्. महाविद्यालयातील काही शिक्षक-प्रशिक्षकांच्या मुलाखती घेवून प्रात्यक्षिकांच्या मूल्यमापनासंबंधित असलेल्या अडचणी, मूल्यमापनाचे स्वरुप व मूल्यमापन साधने यांची माहिती गोळा केली.

५. नमुना निवड पध्दतीपैकी यादृच्छिक नमुना निवड पध्दती वापरुन कांही बी.एड्. महाविद्यालयांची निवड केली. या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना गेल्या दोन वर्षात दिलेले अंतर्गत गुण व विद्यार्थ्यांनी बी.एड्. भाग एक मध्ये मिळविलेले गुण यांच्यातील सहसंबंधाचा शोध घेतला.

६. वरील सर्व संशोधन साधनांचा उपयोग करुन प्राप्त झालेल्या माहितीचे संशोधन उद्दिष्टांच्या दृष्टिने विश्लेषण केले. विश्लेषित माहितीचे विशदीकरण करुन संशोधूाचे निष्कर्ष काढले व प्रात्यक्षिकांच मूल्यमापन करण्यासाठी कांही साधनांची शिफारस केली.

**ब) नमुना निवड पध्दती:** संशोधकाने या संशोधन कार्यासाठी खालीलप्रमाणे संशोधनाचा नमुना निवडला होता.

शिवाजी विद्यापीठाशी २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालये संलग्नित आहेत, यापैकी १७ विना-अनुदानित व ७ अनुदानित महाविद्यालये असून १ शासकीय महाविद्यालय आहे. या महाविद्यालयांतून २०८० प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेतात. ही सर्व संशोधन लोकसंख्या होय.

संशाधकाने संशोधनासाठी बहुस्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दती वापरली. त्याची पध्दती खालीलप्रमाणे होती.

१. प्रश्नावलीद्वारा माहिती गोळा करण्यासाठी एकूण लोकसंख्येच्या ५०% नमुना निवडला होता. त्यासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या चार जिल्हयात असणाऱ्या महाविद्यालयांपैकी प्रत्येक जिल्हयातील ५०% महाविद्यालये लॉटरी पध्दतीने निवडली. म्हणजेच १३ प्राचार्य किंवा प्रभारी प्राचार्य, १०० शिक्षक-प्रशिक्षक यांना प्रश्नावल्या दिल्या व माहिती गोळा केली.

२. वरील नमुन्यापैकी ५० टक्के म्हणजेच लोकसंख्येच्या २५ टक्के प्राचार्य, शिक्षक-प्रशिक्षक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. यासाठी ७ प्राचार्य, ५० शिक्षक-प्रशिक्षक यांची लॉटरी पध्दतीने निवड केली. निवड करताना अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्रमाण कायम ठेवले.

३. वरील पैकी ११ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे गेल्या २ वर्षांचे अंतर्गत गुण व सैध्दांतिक परीक्षेचे गुण सहसंबंध काढण्यासाठी विचारात घेतले.

**क) संशोधनाची साधने व तंत्रे :** संशोधकाने संशोधन कार्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, अंतर्गत मूल्यमापनाचे तक्ते व सैध्दांतिक परीक्षेचे निकाल या साधनांचा अथवा तंत्रांचा समावेश केला. संशोधकाने प्रश्नावली व निरीक्षण सूची ही साधने स्वत: तयार केली. साधने वापरण्यापूर्वी त्यांची विश्वसनियता व सप्रमाणता तपासून पाहिली.

**ड) माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन:** प्रश्नावली आणि मुलाखती याद्वारे माहिती गोळा केली. या माहितीचे वर्गीकरण केले. त्यातून संशोधन उद्दिष्टांच्या अनुषंगाने निष्कर्ष काढले.

## १.६ संशोधनाची आवश्यकता व महत्व

या संशोधनाचा हेतू प्रचलित बी.एड्. महाविद्यालयात होणाऱ्या प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन करणे आणि मूल्यमापन करण्यासाठी योग्य साधनांची शिफारस सुचविणे हा असल्याने या संशोधनातून प्राप्त झालेले निष्कर्ष आणि शिफारशी ह्या बी.एड्. महाविद्यालयात घेतल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिकांच्या मूल्यमापनासाठी उपयोगी पडतील.

सध्याच्या बी.एड्. महाविद्यालयात विविध प्रात्यक्षिक कार्याला दिलेला भारांश कितपत योग्य आहे ? तसेच त्या प्रात्यक्षिक कार्याचे कितपत योग्य मूल्यमापन होते ? या प्रश्नांच्या उत्तरासाठी हे संशोधन उपयुक्त ठरेल. अंतर्गत मूल्यमापन करताना बी.एड्. महाविद्यालयात फक्त बौध्दिक प्रगतीचा विचार केला जातो, त्यामध्ये भावनिक, सामाजिक, नैतिक पैलूंचा विचार केला जात नाही. ठराविक, पारंपारिक व साचेबंद पध्दतीने मूल्यमापन केले जाते. अर्थात हे मूल्यमापन सुयोग्य व विश्वासार्ह वाटत नाही. म्हणून संशोधनामध्ये बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिकांचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी कांही साधनांची शिफारस सुचविली आहे. या शिफारशींद्वारा शिक्षक शिक्षण कार्यक्रमात योग्य समन्वय साधण्यासाठी सदरचे संशोधन नक्कीच उपयोगी पडेल.

## १.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधकाने संशोधन विषयासाठी घेतलेला विषय शिक्षक शिक्षण क्षेत्रातील बी.एड्. अभ्यासक्रम या उपभागाशी संबंधित आहे. हे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या जून,१९९२ पासून झालेल्या सुधारित बी.एड्. अभ्यासक्रमातील बी.एड्. भाग दोन मधील अंतर्गत मूल्यमापनाची पध्दती व स्वरुप आणि त्याचा सैध्दांतिक परीक्षेतील गुणांशी असलेला सहसंबंध यापुरतेच मर्यादित आहे.

या संशोधनातील निष्कर्ष शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित शिक्षणशास्त्र महाविद्यालयात चालणाऱ्या अंतर्गत मूल्यमापनापुरतेच मर्यादित आहेत.

## १.८ संशोधन अहवालाचे व्यवस्थापन

सदरच्या संशोधन अहवालाची मांडणी खालील प्रमाणे केली आहे.

**प्रकरण पहिले : प्रस्तावना :** या प्रकरणात खालील बाबींचा विचार केला आहे.

संशोधन विषयाची पार्श्वभूमी, संशोधन समस्या कथन, संशोधन समस्येतील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची कार्यपध्दती, संशोधनाची आवश्यकता व महत्व, संशोधन पध्दतीची व्याप्ती व मर्यादा, संशोधन अहवालाचे व्यवस्थापन, समारोप

**प्रकरण २ : शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मूल्यमापन व संबंधित संशोधनाचा आढावा** : या प्रकरणात खालील बाबींवर चर्चा केली आहे.

प्रास्ताविक, शिक्षक शिक्षणाचा अर्थ, शिक्षक शिक्षणाची आवश्यकता, शिक्षक शिक्षणाची उद्दिष्टे, शिक्षक-शिक्षण कार्यक्रमाचे स्वरुप, शिवाजी विद्यापीठ बी.एड्. शिक्षक-शिक्षण कार्यक्रमाचे सर्वसाधारण स्वरुप, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मूल्यमापन, शिक्षक-शिक्षण कार्यक्रमातील अंतर्गत मूल्यमापनाची प्रत्यक्ष स्थिती, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील,मूल्यमापनासंबंधी संशोधने, समारोप

**प्रकरण ३ : संशोधनाची कार्यपध्दती**

या प्रकरणात खालील बाबींचा विचार केला आहे.

प्रास्ताविक, संशोधन पध्दती, नमुना निवड पध्दती, संशोधनाची साधने व तंत्रे, माहिती प्रक्रियाकरण पध्दती, समारोप

**प्रकरण ४ : माहितीचे विश्लेषण व विशदीकरण**

या प्रकरणात खालील बाबींचा विचार केला आहे.

प्रास्ताविक, शिक्षक प्रशिक्षकांनी महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कार्यवाहीच्या मूल्यमापनासंबंधी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण व विशदीकरण, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सैध्दांतिक विषयात (बी.एड्.भाग-१) व प्रात्यक्षिक कामात (बी.एड्. भाग-२) मिळालेल्या गुणांचे विश्लेषण व विशदीकरण, समारोप

**प्रकरण ५ : निष्कर्ष व शिफारशी**

हे प्रकरण खालील मुद्दे विचारात घेऊन लिहिले आहे.

प्रास्ताविक, निष्कर्ष, शिफारशी, पुढील संशोधनासाठी विषय

## १.९ समारोप

सदरच्या प्रकरणामध्ये संशोधन समस्येची पार्श्वभूमी, संशोधन समस्येची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा तसेच संशोधनाची थोडक्यात कार्यपध्दती या बाबींचा ऊहापोह केला आहे. यापुढील प्रकरणात संशोधन समस्येशी निगडीत अशा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मूल्यमापनाची, त्याविषयी झालेल्या संशोधनाची सविस्तर चर्चा केली आहे.